


# 5.1.3

**Capacity building and skills enhancement initiatives taken by the institution include the following**

1. **Soft skills**
2. **Language and communication skills**
3. **Life skills (Yoga, physical fitness, health and hygiene)**
4. **ICT/computing skills**

# SPORT DEPARTMENT ANNUAL REPORT-2022-23

The sports department of the college increased the reputation of the college by participating in state, national, inter-college and inter-university competitions in the current academic year. On 1/11/2022 three female athletes participated in the Inter College Outdoor District Competition held at Balbhim College Beed Kumari Brinell Nunes BCom Second Year won gold medal in triple jump and long jump in outdoor competition Kumari Sujata Gadve, BSc Second Year Kumari Sapna Shinde BA Second Year Joined on 15/11/2022 at Shivaji College Kannada Distance Four male and three female athletes participated in the college fencing competition in which Kumari Vaishnavi Jadhav BA First Year won silver medal in EP category and bronze medal in file category while Kumari Ritika Bhingare BSC Second Year Kumari Sujata Gadve, BSC Second Year Kumari Sapna Shinde BA Second Year Chiranjeev. Yogesh Kulkarni BSc Second Year Shubham Bhalekar BA First Year etc. players participated. Four Male Athletes participated in Cross Country Inter College Competition held at BP Ed College Beed on 10/10/2022 Chiranjeev Vinod Misal BA Third Year Arjun Gadve, BA Second Year Shubham Bhalekar BA Second Year Sheikh Shahid Saleem BA First Year participated recorded Two athletes of the college participated in the Balbhim College Beed Intercollegiate Competition which concluded on 2/10/2022 to 3/10/2022 Chiranjeev Vishwajit Munde BSc Second Year and Krishna Mule BCom Second Year which concluded on 20/11/2022 Two male sportspersons of the college participated in inter collegiate wrestling competition at PG Shinde College Paranda Chiranjeev Aniket Arsude and Yashwant Gangane and Kumari Sheikh Mahek Sikandar B.Sc Second Year etc. 4 11 2022 Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Sports Department organized inter collegiate outdoor competition Kumari News BCom Second Year participated in the softball tournament held at Vaidyanath College Parli on 3 11 2022. Ten prize winners of the college participated in which Vinod Misal Rishikesh Vaidya Govind Nagargoje Sheikh Shahid Rohan Shinde Arjun Jadhav Govind Vaidya Shah Rukh Syed Pawan Misal Aditya Bakkad etc. Kumari Vaishnavi Jadhav participated in the State Level Surya Namaskar Competition held at Kolhapur from 24 September 2022 to 25 September 2022. recorded.

PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist Beed 431519

## Sports Department Annual Report in Summer Sports Camp 2022-23

Self-reliance summer sports camp was conducted by Vasundhara Krida Prabodhini from 11/4/2023 to 17/4/2023 in Mahavidyalaya. In the sports training camp, 135 student athletes from various schools of Ghatnandur area participated in the training. 44 girls and 91 boys participated in it. The schedule of the training camp was made as follows. The schedule is as follows: 7.00 am to 7.30 am warning up, 7.30 am to 9 pm Hollyball, Zumba dance, Surya Namaskar, 9.00 am to 9.30 min other events and 5.00 pm to 5.30 pm warning up, 5.30 pm to 7.00 pm fencing kabaddi and outdoor games. On 17/4/2023 from 8:30 AM to 10:00 PM, the athletes who trained demonstrated the sports in front of the chief guest, then the sports training camp was concluded from 10:00 AM to 11:30 AM. Govind Bhaiyya Deshmukh, Director Dr. Samad Saheb, Director. Hon. Mr. Walekar Saheb, Chief Guest S. RT College Ambejogai Prof. Dr. Kiran Chakra Sir, Vice Principal Prof. Dr. Certificate to participating students in presence of Arjun More Sir etc. The program was completed.

PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist Beed 431519

# Summer Coaching Camp












## Sports Department Annual Report
## State Fencing Compitition- 2022-23

On 6th to 8th Oct 2023 at Vaidyanath College Parli V. In Collabaration with Beed District Fencing Association and Vasundhara College Ghatnandur. The 25th Sub-Junior State Level Fencing Championship . The competition was inaugurated on 6 Oct 2023 Time 10:30 AM. As the inaugurator, Mr.Ashok Dudhare (Tokyo Olympics Observer) The Chairman of the ceremony Mr. Satej (Bunty) Patil (President Maharashtra Fencing Association) while Chief Guest Shri. Dattapa Itke Guruji, Shri. Yogesh Kadam, Shri Shivajiraje Bhosale, Prof. Dr.R .D Rathod, Dr. M.B. Dhondge, Principal Dr. Arun Dalve, Dr.K.K. Patil, Mr.Suhasini Deshmukh (District Sports Officer, Beed), Dr. Uday Dongre (Secretary Maharashtra State Fencing Association), Shri. Prakash Katule (Former Chairman), Prof. Dr. P.L. Karad, Prof. Dr. Pandurang Ranmal, Prof. Dr.Atmaram Tekale, Dr.Vijay Bendsure, Mr.Piraji Kusale and others were present.

The competition was conducted in three sessions namely morning, afternoon and evening. A total of 550 players like boys and girls from all over Maharashtra almost 30 districts of Maharashtra, the host team of Beed district as well as officials of the state administration, umpire officials, district secretaries participated in this competition.

In this competition foil team boys first Chhatrapati Sambhajinagar, second-Raigad, third-Solapur and


Bhandara. EP Team Boys 1st- Solapur, 2nd- Latur, 3rd- Chhatrapati Sambhajinagar and Kolhapur. Cyber Team Child 1st- Chhatrapati Sambhajinagar, 2nd- Solapur, 3rd- Raigad and Nagpur. Foil Team Girls 1st - Pune, 2nd - Solapur, 3rd - Chhatrapati Sambhajinagar and Raigad, EP Team Girls 1st - LaturNagpur and Nashik. CYBER TIG GULI First- Chhatrapati Sambhajinagar, Second- Latur, Third- Nagpur and Nashik.

.General Winner Position First Child - Solapur, Second - Ch. Sambhajinagar 3rd- Raigad, General Winner Position 1st Girls - Latur, 2nd Ch. Sambhajinagar, III- Pune.] Dr. Pandurang Ranmal: Sunday 8 Oct 2023 Time 5:00 PM Prize distribution ceremony was held. Hon. Dhananjayaji Munde Saheb (Agriculture Minister, State of Maharashtra) passed auspiciously. The main presence in it was M.A. Satish Chavan (Graduate MLA Marathwada Division), Shri. Satej (Bunty) Patil (President, Maharashtra State Fencing Association), Shri. Ashok Dudhar, Prof. Sadashivappa Munde, Mr. Ajayseth Munde, Mr. Valmikanna Karad, Shri. Bajirao Dharmadhikari, Shri. Govindrao Deshmukh, Mr. Chandulalji Biyani, Prof. Dr. Uday Dongre, Mr. Shrikrishna (Bhowdya) Karad, Shri. Vaijnath Shinde, Prof. Dr. P.L. Karad, Prof. Dr. Pandurang Ranmal, Prof. Dr. Atmaram Tekale, Dr. Vijay Bendsure, Piraji Kusale and Taluka Physical Society, Parli Vaijnath successfully completed the competition with hard work.

PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist Beed 431519

# Yoga Day Celebration






vivo
PHJ5+H77, Ghatnandur, Maharashtra 431519, India
Ghatnandur
Maharashtra
India
2022-06-21(Tue) 07:21(AM)
25°C
77°F
Ghatnandur
घाटनांदूर
old bus stand
Google



**Animal Health Camp**



**Cleanliness Activities**









**Tree Plantation Activities beyond the Campus**



**Tree Plantation in College Campus**



**NSS Rally**



**Shivaji Maharaj Jayanti**



O/C

Kamdhenu Sevabhavi Sanstha's

Est. Year - 2000

# VASUNDHARA COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE, GHATNANDUR

**NAAC ACCREDITED 'B++' Grade, with CGPA2.77**


Dr.Arun Dalve
(M.A.,B.Ed.,Ph.D.)
Principal

Mob. 9822898727
Mob. 9421342148
Mob. 9923019540
website : www.vasundharacollege.org
E-mail -vasundharacollege2000@gmail.com

Ghatnandur, Tq.Ambajogai, Dist.Beed,Pin - 431519 (Maharashtra) E-mail - Principalvcg@rediffmail.Com


Outward No.VCG/20232024 /476 Date 17/6/2023

प्रति,

**मा. संचालक,**
राष्ट्रीय सेवा योजना,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**औरंगाबाद.**

**विषय : रा.से.यो. विशेष निवासी शिबीराचा अहवाल व अंकेक्षण सादर करणे बाबत.**

**महोदय,**

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील राष्ट्रीय सेवा योजना विशेष निवासी शिबीर **दि. ०९.०२.२०२३ ते दि. १५.०२.२०२३** या कालावधीत **मौजे चोथेवाडी ता. अंबाजोगाई जि.बीड** या गावात संपन्न झाले. या कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यासंबधीचा अहवाल पाठवित आहोत.

तरी अहवाल स्वीकृत करावा ही विनंती.

प्राचार्य

**सोबत :** १) अहवाल व फोटो

२) अंकेक्षण अहवाल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद
राष्ट्रीय सेवा योजना
Inward

Tq. Ambajogai Dist. Beed 431519

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
संलग्नित कामधेनू सेवाभावी संस्थेचे,

# वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर
## ता. अंबाजोगाई जि. बीड

### राष्ट्रीय सेवा योजना विशेष वार्षिक शिबिर कार्यक्रम अहवाल
### (युवकाचा ध्यास ग्राम-शहर विकास )
### दि. 09 फेब्रुवारी 2023 ते 15 फेब्रुवारी 2023 मौजे - चौथेवाडी

दि. 09 फेब्रुवारी 2023 ते 15 फेब्रुवारी 2023 या दरम्यान रा.से.यो. चे विशेष वार्षिक शिबीर मौजे चौथेवाडी येथे आयोजित करण्यात आले.

दि. 09 फेब्रुवारी रोजी सकाळी ठिक 11:00 वा रा.से.यो. विशेष शिबिर उद्‌घाटन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा.श्री. बालासाहेब देशमुख, उद्‌घाटक म्हणून मा.समृध्दी दिवाणे-काळे (गटविकास अधिकारी) तर प्रमुख अतिथी म्हणून श्री.अंकुश पवार, अरुणा महादेव निळे, अर्जुन जाधव, प्राचार्य.डॉ.अरुण दळवे, हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.अमोल गंगणे यांनी तर सुत्रसंचलन प्रा. मकरंद जोगदंड व आभार प्रा.डॉ.कोटुळे मॅडम यांनी मानले.

दि. 10 फेब्रुवारी 2023 रोजी सकाळी रा.से.यो. च्या स्वयंसेवकांनी गावातील नाली व रस्ते स्वच्छ केले. दुपारच्या सत्रात ठिकः 3:00 वा **ग्रामीण विकासात युवकांचे योगदान** या विषयावर प्रा.डॉ. अर्जुन मोरे यांचे व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री.राधाकिसन भंडे उपस्थित होते. सायंकाळच्या सत्रामध्ये ग्रामस्थाशी संवाद व चर्चा करण्यात आली.

दि. 11 फेब्रुवारी 2023 रोजी सकाळी श्रमदान करण्यात आले. तसेच दुपारी ठिकः 03:00 वा. डॉ.अमोल गंगणे व प्रा.मकरंद जोगदंड यांचे **राष्ट्रीय सेवा योजनेतून व्यक्तिमत्व विकास** या विषयावर व्याख्यान झाले. सायंकाळच्या सत्रात समाज प्रबोधनपर भारुडाचा कार्यक्रम घेण्यात आला.

दि. 12 फेब्रुवारी 2023 रोजी सकाळी श्रमदान व दुपारच्या सत्रात **आरोग्य शिबीर** घेण्यात आले. या शिबीरामध्ये - 139 नागरिकांनी आपले रक्त चाचणी करुन घेतली. जीवनात आरोग्याचे महत्व या विषयावर आरोग्यसेवक श्री.धनराज पवार सविस्तर मार्गदर्शन केले.

दि. 13 फेब्रुवारी 2023 रोजी सकाळी ठिक:09:00 वा. श्रमदान घेण्यात आले. दुपारच्या सत्रात **व्यसन मुक्ती काळाची गरज** या विषयावर प्रा.जोगदंड व प्रा.डॉ.साळुंके यांचे व्याख्यान झाले.

दि. 14 फेब्रुवारी रोजी सकाळी श्रमदान घेण्यात आले व दुपारच्या सत्रात **ई प्रशासनाचे महत्व** या विषयावर प्रा.दिक्षीत यांनी यांनी व्याख्यान दिले. हे संपूर्ण शिबीर यशस्वी करण्यासाठी सर्व गावकऱ्यांचे सहकार्य लाभले. यावेळी प्रा.अमोल गंगणे, प्रा.मकरंद जोगदंड,रा.से.यो.चे स्वयंसेवक प्रत्येक कार्यक्रमास उपस्थित होते.

दि.15 फेब्रु 2023 रोजी सकाळी ठिक 11:00 वा. रा.से.यो.समारोपाचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री.बालासाहेब (काका) देशमुख तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.विलास घोळवे वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.कें.घाटनांदूर, प्राचार्य डॉ.अरुण दळवे, कार्यक्रमाधिकारी डॉ.अमोल गंगणे, गोविंद वैद्य एन.एस.एस. प्रतिनिधी आदि उपस्थित होते. यावेळी गावकऱ्यांतर्फे राष्ट्रीय सेवा योजना विभागास भिंतीवरील घडयाळ सप्रेम भेट दिली. या कार्यक्रमाचे प्रा.मकरंद जोगदंड यांनी संचलन केले, तर आभार डॉ.अनंत कांबळे यांनी मानले.

अशाप्रकारे रा.से.यो. चे वार्षिक विशेष शिबिर मोठया उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाधिकारी
PROGRAMME OFFICER
National Service Scheme
Vasundhara College, Ghatnandur
Dist. Beed

प्राचार्य PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist. Beed 431519




सन २०२२-२०२३
ते १५ फेब्रुवारी २०२३


राष्ट्रीय सेवा योजना




वसुंधरा कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, घाटनांद्रूर
राष्ट्रीय सेवा योजना


वसुंधरा कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, घाटनांद्रूर
राष्ट्रीय सेवा योजना




चोठेवाडी
Main Rd
Tukaram Balasaheb
Chothewadi Maruti Temple
Rohit jadhav
Google
MGVH+VVH, Chothewadi, Maharashtra 431519, India
Chothewadi
Maharashtra
India
2023-02-12(Sun) 11:24(AM)
29°C
84°F

कार्यारंभ
१० फेब्रुवारी २०२३

# गाव समृद्ध करण्यात रासेयोचा मोलाचा वाटा - समृद्धी दिवाणे



प्रतिनिधी । घाटनांदूर

दि.९ : समृद्ध गाव मोहीम यशस्वी करण्यात राष्ट्रीय सेवा योजनेचा मोलाचा वाटा असल्याचे प्रतिपादन अंबाजोगाई पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने यांनी केले. अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर येथील वसुंधरा महाविद्यालय व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमानाने राष्ट्रीय सेवा योजनेचे युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास या विषयावर विशेष वार्षिक शिबिराचे उद्घाटन चोथेवाडी येथे पार पडले. यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष कामधेनू सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब देशमुख होते तर मंचावर कार्यक्रमाचे उद्घाटक समृद्धी दिवाणे-काळे, विस्तार अधिकारी पवार, सरपंच अरुणा निळे, उपसरपंच अर्जुन जाधव, महादेव निळे संस्थेचे संचालक वामन जाधव, उपप्राचार्य डॉ. अर्जुन मोरे, ग्रामसेविका भोसले बी.एच., मुख्याध्यापक व्ही. जी.जाधव अंगणवाडी सेविका मीना जाधव, विद्यार्थी प्रतिनिधी गोविंद वैद्य गायत्री बोधने उपस्थित होते. यापुढे बोलताना त्यांनी, गाव समृद्ध करण्यासाठी युवकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. त्यामुळे शासनाच्या अनेक योजना गावापर्यंत पोहोचतील आणि गाव समृद्ध होतील. गाव समृद्ध करण्यात राष्ट्रीय सेवा योजनेचा मोलाचा वाटा राहील असे प्रतिपादन केले. अध्यक्ष समारोपात उपप्राचार्य डॉ.अर्जुन मोरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास सांगून महाविद्यालयाच्या राष्ट्रीय योजनेचे युवकाला व गावांना फायदा होतो असे मत व्यक्त केले. यावेळी चोथेवाडीतील ग्रामस्थ माधव जाधव व दिनेश भंडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो जिल्हा समन्वयक व कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.अमोल गंगणे यांनी केले तर सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा.मकरंद जोगदंड यांनी केले व आभार प्रा.डॉ.वायजा कोटुळे यांनी मानले.

लोकमत
दि. २१ फेब्रुवारी २०२३

# 'शिबिरातून सांघिक भावना वाढीस लागते'

लोकमत न्यूज नेटवर्क

घाटनांदूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, कामधेनू सेवाभावी संस्था संचलित वसुंधरा महाविद्यालयाच्या वतीने आयोजित चोथेवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिर पार पडले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन केले.

औरंगाबादचे अधिसभा सदस्य गोविंद देशमुख यांनी प्रमुख पाहुणे म्हणून 'रासेयो'च्या शिबिरातून सांघिक भावना वाढीस लागते, असे सांगितले. यावेळी वामन जाधव, प्रा. डॉ. अमोल गंगणे, कार्यक्रमाधिकारी प्रा. मकरंद जोगदंड आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आदर्श गावकरी

# चोथेवाडी येथे आरोग्य तपासणी शिबिरास उत्तम प्रतिसाद

घाटनांदुर / प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ,औरंगाबाद व वसुंधरा महाविद्यालय घाटनांदुर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत सोमवारी (दि.१३) आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास चोथेवाडी येथील गावकऱ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला.

यावेळी अंबाजोगाई येथील स्वा.रा.ती. रुग्णालय येथून आलेले धनराज पवार, राजेश गवळी व लवांद त्याचबरोबर प्राथमिक आरोग्य केंद्र घाटनांदुर येथून आलेल्या डॉ. प्रज्ञा सुरडकर, श्रीमती डॉ. जोशी, चिनीवार सिस्टर व आशा वर्कर भडे या पथकाने चोथेवाडी येथील गावकऱ्यांची शुगर, बीपी व इतर आरोग्याची सर्व तपासणी केली. यामध्ये जवळपास १३७ व्यक्तींनी आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली. यावेळी धनराज पवार व राजेश गवळी यांनी आरोग्य प्राप्त करण्यासाठी कोणती काळजी घेतली पाहिजे, यासंदर्भात गावकऱ्यांचे समुपदेशन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा. मकरंद जोगदंड यांनी तर प्रास्ताविक जिल्हा समन्वयक प्रा.डॉ. अमोल गंगणे व आभार डॉ. बायजा कोठुळे यांनी केले. यावेळी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सहकारी सोसायटीचे सचिव, सहसचिव सर्व सदस्य राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थिनी व ग्रामस्थ उपस्थित होते.

CC MM YY KK

Auranagabad Edition
15 Feb, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

52

प्रजापत्र
14FEB2023

# चोथेवाडीमधील आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फुर्त प्रतिसाद

घाटनांदुर दि.१३ (वार्ताहर)-डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ,औरंगाबाद व वसुंधरा महाविद्यालय घाटनांदुर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत सोमवारी (दि.१३) आरोग्य तपासणी शिबिर सकाळी ठीक ११:०० वाजता आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास चोथेवाडी येथील गावकऱ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

यावेळी अंबाजोगाई येथील स्वारातीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथून आलेले धनराज पवार,राजेश गवळी व श्री.लवांद त्याचबरोबर प्राथमिक आरोग्य केंद्र घाटनांदुर येथून आलेल्या डॉक्टर प्रज्ञा सुरडकर डॉक्टर जोशी मॅडम यांनी चोथेवाडी येथील गावकऱ्यांची शुगर, बीपी व इतर आरोग्याची सर्व तपासणी केली. यामध्ये जवळपास १३७ व्यक्तींनी आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली. यावेळी श्री धनराज पवार व श्री राजेश गवळी यांनी आरोग्य प्राप्त करण्यासाठी कोणती काळजी घेतली पाहिजे यासंदर्भात गावकऱ्यांचे समुपदेशन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा.मकरंद जोगदंड यांनी तर प्रास्ताविक जिल्हा समन्वयक प्रा. डॉ.अमोल गंगणे व आभार डॉ. बायजा कोठुळे मॅडम यांनी केले.यावेळी गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य , सेवा सहकारी सोसायटीचे सचिव,सहसचिव सर्व सदस्य राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी,विद्यार्थिनी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

O/C

Kamdhenu Sevabhavi Sanstha's
Est. Year - 2000

# VASUNDHARA COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE, GHATNANDUR

NAAC ACCREDITED 'B++' Grade, with CGPA2.77

Dr.Arun Dalve
(M.A.,B.Ed.,Ph.D.)
Principal

Mob. 9822898727
Mob. 9421342148
Mob. 9923019540
website : www.vasundharacollege.org
E-mail -vasundharacollege2000@gmail.com

Ghatnandur, Tq.Ambajogai, Dist.Beed,Pin - 431519 (Maharashtra) E-mail - Principalvcg@rediffmail.Com

Outward No. VCG /2023-2024 1476 Date 27/6/2023

प्रति,

**मा. समन्वयक,**
राष्ट्रीय सेवा योजना,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**औरंगाबाद.**

**विषय : <u>रा.से.यो. नियमित उपक्रमांचा अहवाल व अंकेक्षण सादर करणे बाबत.</u>**

महोदय,

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रमांतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात आले. त्यासंबधीचा अहवाल पाठवित आहोत.

तरी अहवाल स्वीकृत करावा ही विनंती.

प्राचार्य PRINCIPAL
Vasundhara College Ghatnandur
Tq. Ambajogai Dist. Beed 431519

**सोबत :** १) अहवाल व फोटो

२) अंकेक्षण अहवाल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
राष्ट्रीय सेवा योजना
Inward
औरंगाबाद

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. अंतर्गत
कामधेनू सेवाभावी संस्थेचे,
वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर ता. अंबाजोगाई, जि. बीड

# रा.से.यो. वार्षिक अहवाल सन २०२२ - २३

दि. १५/०६/२०२२ रोजी मा. प्राचार्य **डॉ. अरूण दळवे** यांच्या अध्यक्षतेखाली रा.से.यो. च्या पदाधिकाऱ्यांची बैठक बोलविण्यात आली.या बैठकीत खालील विषयावर चर्चा झाली.

१. स्वंयसेवक नोंदणी, रेडरिबन क्लब व आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करणे.
२. स्वंयसेवकांचे उद्‌बोधन व श्रमदान कार्यक्रम राबवणे.
३. थोर पुरूषांच्या जयंतीचे, पुण्यतिथीचे आयोजन करणे.
४. विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या व्याख्यानाचे आयोजन करणे.
५. विविध स्तरावरील स्पर्धा, शिबिरातून स्वयंसेवकांना सहभागी करणे.
६. रक्तगट तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करणे.
७. गणवेश वाटप, वृक्षारोपन कार्यक्रमाचे आयोजन करणे.
८. रा.से.यो. दिन व रा.से.यो. कार्यप्रसिध्दी सप्ताहाचे आयोजन करणे.
९. रा.से.यो. वार्षिक शिबिराचे आयोजन करणे.
१०. नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर कार्यक्रमाचे हिशोब सादर करणे.
११. दि. २१ जुन २०२२ **आंतरराष्ट्रीय योगदिन** महाविद्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी योगाचार्य शिवलिंग महाजन यांनी योगाचे प्रशिक्षण दिले. यावेळी प्राचार्य, डॉ.अरुण दळवे व प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.
१२. दि. ०१/०७/२०२२ कृषी दिनाचे औचित साधून महाविद्यालय परिसरात वृक्षाची लागवड करण्यात आली.

- दि. १३/०७/२०२२ पासून रा.से.यो. स्वयंसेवकांची नोंदणी करण्यास सुरूवात झाली.
- दि. ०१/०८/२०२२ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य, डॉ. अरूण दळवे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रा. डॉ.संजय खाडप व प्रा.उदार एन.एस. हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, प्रा.डॉ. वाघमारे एस.डी.यानी तर सुत्रसंचालन प्रा.डॉ. सवने जी.बी. यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा.जोगदंड सर यांनी मानले.

- दि. ०१ ऑगरट ते १५ ऑगस्ट २०२२रोजी महाविद्यालयाचा परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.
- दि. ०७ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२२रोजी महाविद्यालयाचा श्रमदान कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ केला.
- दि.०९/०८/२०२२ रोजी क्रांतीदिनानिमित्त रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्वयंसेवकांनी वंदे मातरम! भारत माता की जय! अशा घोषणा दिल्या.
- दि.१२/०८/२०२२ व १३/०८/२०१६ रोजी स्वातंत्र्यदिन पूर्व तयारी म्हणून श्रमदान शिबिर घेण्यात आले यावेळी स्वयसेवकांनी महाविद्यालय परिसर स्वच्छ केला.
- दि.१३/०८/२०२२ रोजी स्वच्छता रॅली काढण्यात आली, व हर घर तिरंगा मोहिम राबविण्यात आली.
- दि.१४/०८/२०२२ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त रांगोळी स्पर्धा व हर घर तिरंगा मोहिमचे आयोजन.
- दि. १५/०८/२०२२ रोजी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून ध्वजारोहण कार्यक्रमानंतर मान्यवराच्या हस्ते गणवेश वाटप, वृक्षारोपन करण्यात आले.
- दि.२३/०८/२०२२ रोजी विद्यापीठ वर्धापन दिनाचे औचित्य साधून ध्वजारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्राचार्य, डॉ.अरुण दळवे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले.
- दि. २६/०८/२०२२ रोजी श्रमदान कार्यक्रम घेण्यात आला.
- दि. ०१/०९/२०२२ रोजी एड्स विषयी प्रश्न मंजूषा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मोठया संख्येनी विद्यार्थी सहभागी झाले.
- दि.०५/०९/२०२२ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन याच्या जयंतीचे औचित्य साधून शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.अरुण दळवे तर प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.तुडमे व प्रा.गोडबोले सर होते.
- दि.१७/०९/२०२२ रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले.
- दि.२३/०९/२०२२ रोजी श्रमदान शिबिर घेण्यात आले.
- दि.२४/०९/२०२२ रा. से. यो. दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अरूण दळवे हे होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून डॉ.लहाडे, प्रा.डॉ.अमोल गंगणे व प्रा.डॉ. वाघमारे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. उदार एन.एस. यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.डॉ. सवने जी.बी. व आभार प्रा. दिक्षीत सर यांनी मानले.



□ दि. ०२ ऑक्टोबर २०२२ रोजी लाल बहादूर शास्त्री व महात्मा गांधी यांची जयंती जागतिक अंहिसा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी घेण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. अरूण दळवे हे होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रा. जोगदंड सर व प्रा.डॉ.मोरे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. सवने यांनी केले तर कार्यक्रमाचे संचलन प्रा. दिक्षीत एस.डी. व आभार प्रा.डॉ.कोटुळे बी.एम. यांनी मानले.

□ दि. ३१/१०/२०२२ सरदार वल्लबभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. अरुण दळवे, प्रा.डॉ. अमोल गंगणे, प्रा. जोगदंड व कर्मचारी उपस्थित होते.

दि. ०६/१२/२०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी डॉ. आंबेडकराच्या प्रतिमेचे पुजन प्राचार्य,.डॉ.दळवे ए.वाय. यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

दि. ०३ जानेवारी २०२३ रोजी सावित्रीबाई फुले यांची जंयती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अरुण दळवे हे होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. मनिषा देशमुख, डॉ. अल्का देशमुख उपस्थित होते.

दि. १२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद याची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव गोविंदराव देशमुख तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रा.संतोष मोहिते उपस्थित होते. कॅशलेस व्यवहार कसा करावा या विषयावर मोहिती सरांचे व्याख्यान झाले.

दि. २३ व २४ जानेवारी २०२३ रोजी महाविद्यालयात श्रमदान कार्यक्रम घेण्यात आला.

दि. ३१/०१/२०२३ रोजी लोकशाही पंधरवाडा निमित्त डॉ.तुडमे यांनी व्याख्यानातून लोकशाही बाबत जागृत घडवून आणली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.मोरे होते. प्रास्ताविक प्रा.डॉ.अमोल गंगणे यांनी केले. यावेळी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

दि. ०९/०२/२०२३ ते १५/०२/२०२३ या कालावधीत रा.से.यो. विशेष वार्षिक शिबीर मौजे चोथेवाडी येथे घेण्यात आले.

दि. १९ फेब्रुवारी २०२३ रोजी छात्रपती शिवाजी महाराज जंयतीचा कार्यक्रम घेण्यात आला. या शिवाय विविध शिबिरे,चर्चासत्रासाठी स्वयंसेवकांना पाठविण्यात आले.

कार्यक्रमाधिकारी
PROGRAMME OFFICER
National Service Scheme
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist. Beed

प्राचार्य
PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist. Beed 431519

दैनिक लोकाशा महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा

24SEP2022

# युवकामध्ये राष्ट्रप्रेम निर्माण करण्याचे काम रासेयो करते - मुरलीधर लहाडे

घाटनांदुर, दि.२४ (लोकाशा न्युज): येथील वसुंधरा महाविद्यालयातील रासेयो विभाग व हिंदी विभाग द्वारे रासेयो व हिंदी दिन साजरा करण्यात आला. यावेळी जनविकास महाविद्यालय बनसारोळा येथील प्रो. मुरलीधर लहाडे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयातील उपप्राचार्य प्रा डॉ अर्जुन मोरे होते तर मंचावर कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.अमोल गंगणे हिंदी विभागध्यक्षा प्रा.डॉ.बायजा कोटुळे उपस्थित होते. यावेळी प्रा.डॉ.पांडुरंग रणमाळ प्रा.डॉ. सखाराम वाघमारे विद्यार्थिनी कु.अंजली बोधने यांचा प्रमुख पाहुण्यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. हिंदी विभाग द्वारा



प्रकाशित शब्दकलश भिती पत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा.डॉ.अमोल गगणे व प्रा.डॉ.बायजा कोटुळे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.डॉ.गजानन सवने यांनी केले व आभार प्रा.अनंत कांबळे यांनी मांडले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत
बुधवार, दि. २८ डिसेंबर २०२२

# बीड जिल्हा समन्वयकपदी अमोल गंगणे यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क



घाटनांदूर : वसुंधरा महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अमोल गंगणे यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या बीड जिल्हा समन्वयकपदी नुकतीच निवड केली आहे.

त्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब देशमुख, सचिव गोविंदराव देशमुख, प्राचार्य डॉ. अरुण दळवे, उपप्राचार्य डॉ. अर्जुन मोरे, डॉ. मुंजाभाऊ धोंडगे, डॉ. राजेश करपे यांनी कौतुक केले आहे.

# वसुंधरा महाविद्यालयात विद्यापीठ नामविस्तार व भूगोल दिन साजरा

घाटनांदुर (प्रतिनिधी) येथील वसुंधरा महाविद्यालयात औरंगाबाद डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, नामविस्तार व भूगोल दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कामधेनू सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब देशमुख होते .तर प्रमुख अतिथी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादचे अधिसभा सदस्य व संस्थेचे सचिव गोविंदराव देशमुख, प्राचार्य डॉ. अरुण दळवे प्रा. डॉ. सखाराम वाघमारे होते.



वंसुधरा महाविद्यालयात मराठवाडा डॉ. बाबासाहेब आंबेडकर नामविस्तार दिन व भूगोल दिन साजरा करण्यात आला.

प्रा.डॉ. सखाराम वाघमारे यांनी विद्यापीठ नामविस्तार दिनाचा इतिहास सांगून भूगोल दिनाचे महत्त्व विशद केले तर श्री .गोविंदराव देशमुख यांनी विद्यापीठ नामविस्तार चळवळीचा आढावा घेत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अरुण दळवे यांनी विद्यापीठ नामविस्तार व भूगोल दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. गोविंद झाडके यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.गणपत कांदे यांनी कले . आभार प्रा. डॉ. मुकुंद काळे यांनी मानल.

या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहु संख्येने उपस्थित होते.

लोकमत
बुधवार, दि. ७ जून २०२३

# वसुंधरा महाविद्यालयात पर्यावरण दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

घाटनांदूर : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण, वन आणि हवामान बदल या उपक्रमांतर्गत वसुंधरा महाविद्यालयात पृथ्वीगोलाला प्रा. डॉ. अमोल गंगणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी प्रा. डॉ. सखाराम वाघमारे, प्रा. गोविंद झाडके, प्रा. नरसिंग उदार, प्रा. डॉ. संजय खाडप, प्रा. डॉ. गजानन सवणे, प्रा. गणपत कांदे, प्रा. उमेश घुले, प्रा. श्रीधर साळुंके, प्रा. मकरंद जोगंदड, प्रा. संजय जाधव यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षण व संवर्धन यासंदर्भात शपथ दिली. यानंतर महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर प्लास्टिक मुक्त व स्वच्छ करण्यात आला. तसेच देशी वृक्षांची लागवड करण्यात आली.



प्राध्यापक, विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षण व संवर्धनसंदर्भात शपथ देण्यात आली.

यशस्वितेसाठी प्रा. रामेश्वर गव्हाणे, प्रा. मुकुंद काळे, प्रा. हेमराज जाधव, संभाजी खरटमोल, कुमार बिराजदार, श्रीमती उर्मिला माले, सुग्रीव जाधव यांनी परिश्रम घेतले.

दैनिक **लोकाशा** महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा

13FEB2023

# चोथेवाडी येथील आरोग्य तपासणी शिबिरास उदंड प्रतिसाद

घाटनांदुर, दि.१३ (लोकाशा न्युज):- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व वसुंधरा महाविद्यालय घाटनांदुर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत मौजे चोथेवाडी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

घाटनांदूर पासून जवळच असलेल्या मौजे चोथेवाडी येथील गावकर्यांनी आरोग्य शिबिरास उत्तम प्रतिसाद दिला. यावेळी अंबाजोगाई येथील स्वारातीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथून आलेले धनराज पवार, राजेश गवळी व लवांद त्याचबरोबर प्राथमिक आरोग्य केंद्र घाटनांदुर येथून आलेल्या डॉक्टर प्रज्ञा सुरडकर डॉक्टर जोशी, चिनीबारसिस्टर व आशा वर्कर भडे ताई या पथकाने चोथेवाडी येथील



गावकऱ्यांची शुगर, बीपी व इतर आरोग्याची सर्व तपासणी केली. यामध्ये जवळपास १३७ व्यक्तींनी आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली. यावेळी श्री धनराज पवार व राजेश गवळी यांनी आरोग्य प्राप्त करण्यासाठी कोणती काळजी घेतली पाहिजे यासंदर्भात गावकर्यांचे समुपदेशन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा.मकरंद जोगदंड यांनी तर प्रास्ताविक जिल्हा समन्वयक प्रा.डॉ.अमोल गंगणे व आभार डॉ.बायजा कोठुळे मॅडम यांनी केले. यावेळी गावातील सरपंच महादेव निळे, युवा नेते महादू जाधव, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सहकारी सोसायटीचे सचिव, सहसचिव सर्व सदस्य राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थिनी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

50

PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Ta. Ambajogai Dist.Beed 431519